INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
ISSN 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# राष्ट्रीयकरणानंतर व्यापारी बँकांच्या स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास

**डॉ. विनोद आ. नन्नवरे**
अर्थशास्त्र विभाग,
डॉ.अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,
जळगाव

**डॉ. सचिन भास्कर कुंभार**
अर्थशास्त्र विभाग,
डॉ.अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय,
जळगाव

**DOI Link** :: http://doi-ds.org/doilink/04.2021-39624312/IRJHIS2104003

**प्रस्तावना:**

देशाच्या अर्थकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या बँकिंग क्षेत्रात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक सुधारणासह अनेक बदल करण्यात आले आहते. आणि त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात झाले परिणामी सरकारने १९६९ मध्ये १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयाकरण करण्याचा निर्णय घेतला व यामुळे देशातील बँकांच्या झपाट्याने विस्तार झाला. गावागावांत बँक सेवा पोचली तेव्हापासून ते आजतागायत देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासामध्ये बँकांचा सहभाग वाढलेला आहे. गेल्या पाच वर्षांत जनधन खात्याच्या माध्यमातून आणि बँकिंग क्षेत्रातील जागरूकतेमुळे बँकिग क्षेत्र दहा टक्क्यांनी वाढले आहे. बँकिंग क्षेत्राच्या विस्ताराचा हा प्रवास १९ जुलै १९६९ च्या बँक राष्ट्रीयीकरणापासून सुरू झाला आहे. श्रीमंत ते सर्वसामान्य कामगार या सर्वांना जोडणारी बँक राष्ट्रीयीकरणाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष देशभर साजरे केले.

१९ जुलै १९६९ मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. त्याला ५२ वर्ष पुर्ण होत आहे. या निर्णयामुळे देशात अनेक मोठे प्रकल्प उभे राहिले. कृषी, लघु उद्योग क्षेत्राला पैशाचा आधार मिळाला. देशाच्या अर्थकारणावर दूरगामी करणाऱ्या निर्णयांपैकी एक म्हणजे भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय. १९८० रोजी भारतातल्या ०६ बँकांचे राष्ट्रीययीकरण करण्याचा निर्णय झाला.त्यानंतर मोदी सरकारने जनधन खाते योजना सुरू करून देशातील सर्वसामान्य व कामगार आपला पैशाची बचत करतील अशी व्यवस्था केली.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१) राष्ट्रीयकरणानंतर व्यापारी बँकांच्या स्थितीत झालेल्या बदलाचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके :**

१) राष्ट्रीयकरणानंतर व्यापारी बँकांच्या स्थितीत अनेक बदल घडून आले आहेत.

२) राष्ट्रीयकरणानंतर देशातील विविध बँकांचे विकासातील योगदान महत्वपुर्ण आहे.

**संशोधन पध्दती :**

सदर संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम साधन साम्रगीचा वापर केला असून यात वर्तमान पत्र संदर्भ ग्रंथ आणि इंटरनेट वरील माहितीचा समावेश केला आहे.

**१९६९ पूर्वीची परिस्थिती कशी होती ?**

१९६९ पुर्वी भारतात बँका मोठ्या प्रमाणात खासगी स्वरूपाच्या होत्या. या बँकांवर भांडवलदार, मोठे सावकार यांचं वर्चस्व होत. या सर्व बँकांचे व्यवहार हे फारसे विश्वसनीय नव्हते. १९४७ पासून १९६० पर्यंत जवळपास ३६१ बँकांचे व्यवहार अडचणीचे ठरत होते किंवा पारदर्शक नव्हते. आर्थिक शिस्तीचा लवलेशही या बँकांना नव्हता. या बँकांवर नियंत्रण आणण्याचं सर्वात महत्वाचं कारण म्हणजे बहुतांश बँकांनी कृषी क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केलं होत. सर्व बँकांचा ओढा हा व्यवसाय आणि व्यावसायिक यांच्याकडेच होता.

इकॉनॉमिक टाईम्सच्या एका अहवालानुसार, १९४७ ते १९५५ या कालावधीत देशभरात ३६१ बँक या त्यांच्या व्यवहारात अयशस्वी ठरल्या होत्या. त्यामुळे त्यांच्याकडच्या सामान्य ठेवीदारांनी आपआपले पैसे गमावावे लागले. कारण त्यांच्या संबंधीत बँकांनी ठेवीदारांना कोणतीही हमी दिली नव्हती. सामान्य ठेवीदारांचे पैसे बुडीत खात्यात जाऊ नये, त्यांना त्यांच्या पैशांची हमी मिळावी म्हणून सरकारने पतधोरण ठरवत बँकांचे राष्ट्रीयीकरण केले.

**कोणत्या बँकांचे झाल राष्ट्रीयीकरण ?**

१९६९ पर्यंत भारतात बँका या खासगी संस्था म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्यावर सरकारचा कुठलाही थेट अंकुश नव्हता. देशातील ७०% पैसा हा या बँकाच्या हातात होता. त्यामुळे हे क्षेत्र सरकारच्या नियंत्रणाखाली आणण आवश्यक झाल होत. बँक राष्ट्रीयीकरणाच्या मुख्य उद्देशांमागे कृषी, लघुउद्योग, व्यापारी आणि उद्योजकांना क्रेडिट सुलभ उपलब्ध करून देण. शिवाय ग्रामीण आणि मागास भागात बँकांच्या शाखांच जाळ तयार करायच होत.

मोठे उद्योगदंधे आणि भांडवलदारांना अनुकूल असच धोरण या बँका सातत्याने राबवत असल्याच चित्र होत. एकप्रकारे या बँका मोठे उद्योग आणि उद्योगपतीसाठीच चालवल्या जात होत्या अशीच त्यावेळची परिस्थिती होती. देशाचा कणा असलेले कृषी आणि लघुउद्योग यांसारख अत्यंत महत्त्वाच क्षेत्र खासगी बँकाकडून कायमच दुर्लक्षित ठेवल गेल. १९५० मधे एकूण कर्ज वितरणाच्या फक्त २.३० टक्के कर्ज हे कृषी क्षेत्राला देण्यात आल होत. पुढील काळात यात सुधारणा होण्यापेक्षा १९६७ ला एकुण कर्ज वितरणाच्य फक्त २.२ टक्केच कर्ज हे कृषी क्षेत्राला देण्यात आल. १०० कोटींपेक्षा अधिक भाग भांडवल असणाऱ्या एकूण १४ मोठ्या खासगी बँकांच राष्ट्रीयीकरण करण्यात आल. यात आलाहाबाद बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, देना बँक, इंडियन बँक, बँक पंजाब अँड सिंध बँक, सिंडिकेट बँक, ओवरसीज बँक, पंजाब नॅशनल बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया या बँकांचा समावेश होता.

देशभरातील बँकिग क्षेत्राचा विस्तार ८० टक्के लोकांपर्यंत गेला आहे. २०१४ पासून ते २०१९ पर्यंत जनधन व विविध योजनांचा यात मोठा वाटा आहे. शहरे बाजाराच्या मोठ्या गावांपुरत्या मर्यादित राजणाऱ्या बँका आता गावागावांत

पोचल्या आहेत. तथापि अजूनही देशभरात २० टक्के लोक बँकिग क्षेत्रापासून वंचित आहेत. २०१३ पर्यंत ७० टक्के लोकांपर्यंत बँका पोचल्या होत्या. यात पाच वर्षांत दहा टक्कांनी वाढ झाली. ३१ मार्चपर्यंत राज्यात दोन कोटी ४९ लाख जनधन खाती उघडण्यात आली. याद्वारे शासकिय योजनेतील सबसिडी थेट लाभधारकांच्या खात्यात जमा करण्यात आली. यासह रूपे कार्डवर ग्राहकांचा विमाही अतरविण्यात आला आहे. विशेष म्हणजे यातील एक कोटी २२ लाख खाती ही ग्रामीण भागातील असल्याची माहिती राज्यस्तरीय बँकर्स कमिटीने अहवालात दिली आहे.

गेल्या पन्नास वर्षांत बँकिग क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले. ते राष्ट्रीयीकरणामुळे शक्य झाले. भारतीय पोस्ट खात्याने बँकिंग क्षेत्रात पाऊल ठेवत बँक ग्राहकांच्या दारावर नेऊन पोचविली गेल्या पाच वर्षापासून नवीन धोरणे लागू झ ाली. २०१६ मध्ये सहा राष्ट्रीयीकृत बँकांचे एसबीआय मध्ये विलीनीकरण करण्यात आले. यामुळे देशभरातील बहुतांश शाखा बंद पडल्या त्यानंतर २०१९ मध्ये देना, विजया आणि बडोदा बँकांचे एकत्रीकरण करीत एक मोठी बँक तयार करण्यात आली. यानंतरही अनेक शाख बंद कराव्या लागल्या. देशभरातील एटीएम ही झपाट्याने कमी करण्यात आले.

**खासगी बँकांची उभारी**

सार्वजनिक बँकांपेक्षा खासगी बँकांचा या पाच वर्षात झपाट्याने विकास झाला आहे. तसेच सुक्ष्म वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थाही झपाट्याने वाढल्या. सरकारतर्फे सार्वजनिक बँकापेक्षा खासगी बँकांकडे लक्ष देण्यात येत आहे. मुद्रा, स्टँडअप यांसह अनेक कर्जयोजना या सर्वाजनिक बँकांकडून राबविण्यात आल्या. खासगी बँकांना याचे उद्दिष्ट कमी देण्यात आले आहे. यामुळेच खासगी बँका नफ्यात आणि सार्वजनिक बँकांचा एनपीए वाढत चालला आहे.

**अनेक खासगी बँका निघाल्या बुडीत**

१९५१ मध्ये देशात ५६६ व्यापारी बँका होत्या. बँकांचे राष्ट्रीयकरण झाले तेव्हा म्हणजेच १९६९ मध्ये त्यांची संख्या ९१ वर आली होती. १८ वर्षात ४७७ बँका पडद्याआड गेल्या होत्या. यासह १९८५ पासून बँक ऑफ कोचीन लि. लक्ष्मी कमर्शियल बँक, बँक ऑफ बिहार, हिदुस्थान कमर्शिअल बँक, मिरज स्टेट बँक, दि ट्रेडर्स बँक ऑफ क्रेडिट ऍण्ड कमर्शियल इंटरनॅशनल, दी बँक ऑफ तामिळनाडू, बँक ऑफ तंजावर, दी परूर सेंट्रल बँक, दी युनायटेड इंडस्ट्रीअल बँक, दी बँक ऑफ कराड, बरेली कॉर्पोरेशन बँक सिक्कीम बँक बनारस स्टेट बँक नेदूनगुडी बँक, भारत ओव्हरसीस बँक, ग्लोबल ट्रस्ट बँक या १९ खासगी बँका बुडीत निघाल्या. तर तेवढ्याच बँका सार्वजनिक बँकांमध्ये विलीन करण्यात आल्या.

**राष्ट्रीयीकरणापूर्वी बँका उद्योजकांच्या ताब्यात**

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात १९३५ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस समितीने पंडित नेहरू व सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय नियोजन समिती नेमली होती. या समितीने बँकांच्या राष्ट्रीय नियोजन समिती नेमली होती. या समितीने बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रस्ताव मांडला होता. तेव्हा ते शक्य झाले नाही. तथापि. भारतीय बँकिंग क्षेत्राला दोनशे वर्षांचा इतिहास आहे. पुर्वी बँका खासगी मालकीच्या होत्या. यात प्रामुख्याने सेंट्रल बँक ऑफ इंडिया (स्थापना

१९११) युको बँक (पूर्वीची युनायटेड कमर्शियल बँक १९४३), बँक ऑफ बडोदा (१९०८), ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स(१९४३), इंडियन बँक(१९०७), सिंडिकेट बँक(१९२५), आणि विजया बँक(१९३१), या बँकांचा समावेश होता समाजातील उच्चभ्रू वर्गापुरताच बँकांचा ग्राहकवर्ग मर्यादित होता बँकिंग शहरापुरतेच मर्यादित होते. मात्र राष्ट्रीयकरणानंतर हे चित्र पुर्णत: बदलले.

**बँकांचे विकासातील योगदान**

१९६९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील ठेवी सकल घरगुती उत्पन्नाच्या फक्त १३ टक्के म्हणजे ४ हजार ६४६ कोटी होत्या. तर दहा टक्के म्हणजे ३ हजार ५९५ कोटीचे कर्ज होते. आज त्यात कैकपटींनी वाढ झाली आहे. विकासाच्या निर्देशांकाच्या भाषेत अर्थव्यवस्थेने केलेल्या या प्रगतीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये केलली गुंतवणूक: तसेच कर्जपुरवठा यामुळे सरकारला अन्नधान्य उत्पादनासाठी एकाधिकार खरेदी योजना राबविणे शक्य झाले आहे.

**राष्ट्रीयीकरणाच्या काळातील आणि आताच्या झालेल्या बदल** (शाखानिहाय)

| **बँका** | **जून १९६९** | **मार्च २०१९** |
|---|---|---|
| १. कमर्शिअल बँक | ८९ | २२२ |
| २. शेड्युल कमर्शिअल बँक | ७३ | १४७ |
| ३. देशभरातील बँकांची कार्यालये | ८२६२ | १,४१,७५६ |
| ४. ग्रामीण | ८२६२ | ५०,०८१ |
| ५. सेमी अर्बन बँक | ३३४२ | ३९,०६३ |
| ६. अर्बन (शहर) बँक | १५८४ | २५,४९८ |
| ७. मेट्रो | ६४ | १०,२०० |

**राष्ट्रीयीकृत बँका आजही महत्त्वाच्या**

| **डिपॉझिट** | **वर्ष १९६९** | **मार्च २०१९** |
|---|---|---|
| १. शेड्युल कर्मशिअल बँक डिपॉझिट | ४६४६ कोटी | १.२२.२६.२४० कोटी |
| २. (डिमांड डिपॉझिट) चालू खाते | २१०४ कोटी | १२.९०.७२० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ३. (टाइम डिपॉझिट) फिक्स डिपॉझिट | २५४२ कोटी | १.०९.३५.५२० कोटी |
| ४. शेड्युल कर्मशिअल बँकेची कर्जे | ३५९९ कोटी | ७७.३०.३०० कोटी |
| ५. बँकांचे इन्व्हेस्टमेंट्स | १३६१ कोटी | ३३.९३.२६० कोटी |
| ६. प्राथमिक क्षेत्रातील कर्जे | ५०४ कोटी | २५.५३.१८७ कोटी |

(Maharashtratimes.com)

**राष्ट्रीयीकरणानंतर सामान्यांचा असा झाला फायदा**

२०१८ मध्ये देशभरात १.१५ कोटी नागरिकांनी पंतप्रधान विमा उतरविला होता. यात पंतप्रधान सुरक्षा विमा योजना ८०.५१.०४६ कोटी, पंतप्रधान जीवनज्योती योजना ३४.६१.५२३ आणि एकूण एक कोटी १५ लाख १२ हजार ५७२ कोटींचा विमा उतरविला होता.

**निष्कर्ष:**

१. बँकांच राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे भारतातल्या अनेक मोठ्या प्रकल्पांनी आकार घेतला आणि ते यशस्वी झाले.

२. आज भारतात एकूण २० राष्ट्रीय बँका आहेत. पूर्वी राष्ट्रीय बँका २८ होत्या. स्टेट बँकेने आपल्या सातही सहयोगी बँका स्वत:मधे विलीन करून घेतल्याने आता राष्ट्रीय बँकांची संख्या १२ झाली.

३. आज खाजगी क्षेत्रातही अनेक बँका कार्यरत झाल्यात. देशात २०१४ पर्यंत १.२५ लाख बँकशाख आहेत. त्यातल्या ३५ हजार शाख या खेड्यांमधे आहेत. आज भारतातल्या बहुतांश ग्रामीण भागापर्यंत मोठ्या बँका पोचल्यात. एकट्या एसबीआयच्या भारतभर १० हजाराहून अधिक शाखा आहेत. आणि अनेक बँकांनी आपल्या शाखा सुरू केल्यात. आज २३५ लाख कोटी रूपयांच बँकिंग उद्योगाची ताळेबंद म्हणजे बॅलन्सशीट आहे.

४. देशातल्या कानाकोपऱ्यापर्यंत आज विविध बँकेच्या शाखा सुरू झाल्यात. त्यामुळे सर्वसामान्य लोक बँकिंगशी म्हणजेच थेट देशाच्या अर्थकारणाशी जोडले जाताहेत.

५. जनधन योजनांसारख्या महत्वाकांक्षी योजनेतून मोल मजुरी किंवा कष्टकरी अतिसामान्य वर्ग बँकिग क्षेत्राशी जोडण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू आहे. आजवर जनधन योजनेद्वारे अंदाजे ३५ लाख बँक खाती उघडण्यात आलीत.

६. गेल्या काही वर्षांत पेटीएम सारख्या पेमेंट बँका आणि स्मॉल बँका उदयास आल्यात. भविष्यात त्यांचा मोठा विस्तार होण अपेक्षित आहे.

७. एकीकडे साऱ्या महत्वाच्या योजना राष्ट्रीयीकृत बँकांकडे सोपवल्या जात असताना त्यांच्या शाखा मात्र झपाट्याने बंद होत आहेत. आज बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू होत असताना या बँकांचे जाळे बळकट होण्याकडे सरकारने लक्ष द्यायला हवे.

**संदर्भ :**

१. भारतीय अर्थव्यवस्था - देसाई भालेराव निराली प्रकाशन

२. संशोधन पध्दती - प्रदिप आगलावे

३. आधुनिक बँकिंग आणि भारतीय वित्तीय बाजार - डॉ. एन.एल. चव्हाण, प्रशांत पब्लीकेशन

४. esakal.com/Maharashtra/centralation-bank-turns

५. Maharashtratimes.com/editorial/article